ISSN-2321-211X


# RESEARCH PROCESS

International Journal of the Social Research Foundation

INC - DEIS January 2020 Special Issue Volume II

UGC Approved

Peer Reviewed and Refereed Journal



Social

RESEARCH FOUNDATION

पर्यावरणासोबतच स्वच्छ भारत उद्दिष्ट गाठण्यास मदत होईल. ही योजना शहरी भागापासून ते ग्रामीण भागापर्यंत राबविली जाते. यात स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रोत्साहनपर बक्षीसांचे वितरण करुन पर्यावरणाच्या संदर्भामध्ये जाणीव जागृती वाढविली जाते.

अरवली पर्वताच्या क्षेत्रात खणकाम करण्यासाठी पर्यावरण क्लिअरन्स घ्यावे लागेल अशी तरतूद शासनाने केली आहे. यामुळे पर्यावरणाची हानी यावर शासनाचे नियंत्रण राहील.

भारतातील हरित आच्छादन वाढविण्यासाठी वनीकरण व्यवस्थापन व नियोजन निधी म्हणून राज्यांना ४७,४३६ कोटींचा निधी देण्यात आला आहे. २००१ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने वनीकरणासाठी स्वतंत्र निधी स्थापन करण्याचे आदेश भारत सरकारला दिले होते. २००९ मध्ये वनीकरणासाठी राज्यांना दरवर्षी १००० कोटी देण्याचे आदेश न्यायालयाने दिले होते. त्याची अमलबजावणी शासनस्तरावर होताना दिसत आहे.

पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश या राज्यांतील शेतीतील कचरा जाळल्या कारणाने होणाऱ्या प्रदुषण नियंत्रणासाठी यंत्रनिर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी ज्यामुळे कमी प्रमाणात हवा प्रदुषण होईल या कारणास्तव २०१८–२०१९ आणि २०१९–२० या वर्षासाठी ५९१.६५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

१२ जानेवारी २०१७ रोजी दिल्लीमध्ये 'ग्रेडेड रिस्पॉन्स ॲक्शन प्लॅन' (जीआरएपी) अधिसूचना तयार केली आहे. यात मोठया वाहनास प्रवेश बंदी, हॉटमिक्स वरील बंदी, कचरा जाळणे अशा बाबींवर बंदी घालण्यात आली. वरील प्रकारचे निर्णय शासन स्तरावर वारंवार होताना दिसून येते आहे.

कॅट स्किल या खोऱ्यातील पाणलोट क्षेत्रातून न्यूयॉर्क शहराला पाणीपुरवठा होतो. या खोऱ्यातील जंगलाचे संवर्धन केल्यामुळे आणि तेथे अनैसर्गिक कामांना अटकाव केल्यामुळे ९० टक्के पाणी पुरवठयासाठी शुद्धीकरणाची गरज भासत नाही. अशावेळी या पाणलोट क्षेत्राचे जतन करणे आवश्यक ठरते.

आज इस्त्राईल हा देश पाण्याच्या पुनर्वापरासाठी आणि त्याच्या तंत्रज्ञानासाठी प्रसिद्ध आहे, तेथे ८० टक्के पाण्याचा पुनर्वापर होतो तर स्पेनमध्ये १७ टक्के पाण्याचा पुनर्वापर होतो. अमेरिकेसारख्या राष्ट्रात फक्त ५ टक्के पाण्याचा पुनर्वापर होताना दिसून येतो. विशेष म्हणजे इस्त्राईलमध्ये हे प्रकल्प अमेरिकेकडून होणाऱ्या 'ज्युईश नॅशनल फंड' अर्थ पुरवठयातून राबविला जातो.

ग्लोबल वार्मिंगचे परिणाम साऱ्या जगालाच भोगावे लागणार आहे. त्यामुळे स्वत:चा स्वार्थ न पाहता समस्त मानव जातीच्या अस्तित्वासाठी प्रदुषणावर नियंत्रण प्रस्थापित करायला हवे. म्हणून भौतिक विकास पर्यावरणाला पोषक असला पाहिजे मारक नाही.

**References:**


वाढते तापमान, बुडती बेटे – डॉ. बी.बी. माळी, लोकसत्ता, "बप इट १५ ऑक्टोबर २०१३.
वाळवंटीकरण रोखण्याच्या प्रयत्नात (लोकसत्ता), अनु.संकलन – महेश सरलष्कर, १५ सप्टेंबर २०१९.
आशियाई तपकिरी ढग आणि आपण, नंदा खरे, लोकसत्ता, संपादकीय लेख, १२ नोव्हेंबर २०१९.
प्लास्टिकचा राक्षस संपवायचा कसा, राजेंद्र येवलेकर, लोकसत्ता संपादकीय लेख, २७ जुलै २०१९.
पर्यावरणाचे अर्थकारण समजून घ्यायला हवे, अनिकेत भातखंडे, लोकरंग, १ डिसेंबर २०१९.
प्रतियोगिता दर्पण, जून –जुलै २०१७, ऑगस्ट २०१९, जुलै २०२०.


[The final revised version of this paper was received on 30 December 2019]




*Research Process* **ISSN 2321-211X**
**INC-DEIS 2020 Special Issue: Volume II, pp. 35-3**
**© Social Research Foundatio**


## महाराष्ट्राचा औद्योगिक विकास: एक दृष्टिक्षेप


**माधवराव नरसिंगराव बिरादार**
सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
दिंगबरराव बिंदु महाविद्यालय,
भोकर जि.नांदेड.
**Email:** drmadhavbiradar65@gmail.com



*महाराष्ट्राची भौगोलिक स्थिती, वित्तीय सोयी, मुलभूत सुविधा उपलब्ध असल्यामुळे औद्यो विकास जलदगतीने झाला आहे. तसेच महाराष्ट्राला अत्यंत गौरवशाली ऐतिहासिक व सांस्कृतिक लाभली असून सातत्याने स्थिर व गंभीर राजकीय नेतृत्व लाभले आहे. कार्यक्षम प्रशासन, उद्योग उभार जिद्द असलले लहान–मोठे उद्योजक, भरपूर कौशल्य असलेले तंत्रज्ञ व कामगार, उद्योग वाढीसाठी आव असलेल्या प्राथमिक सुविधांचा मोठया प्रमाणात विकास तसेच सामाजिक सेवा निर्माण करण्याकर या गोष्टीमुळे महाराष्ट्राचा देशाच्या औद्योगिक विकासात नेहमीच सिंहाचा वाटा राहीला आहे. प्रस्तुत शोध नि महाराष्ट्रातील औद्योगिक विकासावर एक दृष्टीक्षेप टाकण्याचा प्रयत्न केला आहे.*



*[Key Words: औद्योगिकीकरण, पर्यावरण, तंत्रज्ञान]*


**प्रस्तावना :**

अर्थव्यवस्थेचा समतोल विकास साधण्यासाठी कृषि विकासाबरोबरच उद्योगक्षे विकास घडवून आणणे महत्वाचे आहे. अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी उद्योगाची वाढ विकास होणे अपरिहार्य आहे. विकासाची वरची पातळी गाठण्यासाठी उद्योगक्षेत्राच्या वा व विस्ताराची आवश्यकता असते. नवीन तंत्रज्ञान, नवीन आणि नाविण्यपूर्ण कौशल्य, उद्योगधंदे, मोठी शहरे, या बाबी उद्योगाच्या विकासातून साध्य करता येतात. उद्योगाच्या विकासामुळे लोकांना, रोजगार मिळून त्यांचे उत्पन्न वाढते, बचत व गुंत वाढते वस्तू व सेवांच्या, मागणीत वाढ होते. परिणामी लोकांना आधुनिकीकरणाची चाखायला मिळू लागतात. त्यामुळे लोकांचे राहणीमान उंचावण्यास मदत होते. औद्योगिक क्षेत्राच्या विकासाचा शेतीक्षेत्रावर देखील अनुकूल परिणाम होतो. त्य महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपासूनच महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्रात उद्योग क्षेत्राची निकोप वाढ व्हावी, आपल्या राज्याची औद्योगिक प्रगती व्हावी व त्याप्र औद्योगिकरण व्हावे या सर्व गोष्टींना प्राधान्य दिले आहे. त्यामुळेच महाराष्ट्र रा भारतातील औद्योगिक क्षेत्रात एक अग्रेसर राज्य राहिलेले आहे. इतर राज्याच्या तु महाराष्ट्रातील उद्योगक्षेत्राचा अधिक विकास झालेला आहे. राज्याच्या आर्थिक विव उद्योगक्षेत्राचा वाटा अधिक आहे.

प्रस्तुत शोध निबधांत महाराष्ट्रातील औद्योगिक विकासावर एक दृ टाकण्याचा प्रयत्न केला असून करण्यात आलेला असून तो पुढील प्रमाणे आहेत.

**१) औद्योगिक गुंतवणूक** : अर्थव्यवस्थेच्या वेगवान विकासासाठी मोठया प्रमाणा गुंतवणूकीची आवश्यकता असते. भांडवल गुंतवणूकीमुळे आर्थिक विकासाला गती गुंतवणूकीत वाढ झाल्यास रोजगार वाढतो. त्यामुळे उत्पन्न पातळीत वाढ, बचतीत पुन्हा गुंतवणूकीत वाढ असे चक्र सुरु होते. भारत सरकारने १९४९ मध्ये औ धोरणामध्ये केलेल्या सुधारणा लक्षात घेवून जास्तीत जास्त औद्योगिक गुंतवणूक

करण्यासाठी राज्य शासनानेही केंद्र सरकारच्या धर्तीवर आपल्या धोरणात मूलगामी बदल केले. सार्वजनिक क्षेत्रासाठी असलेले क्षेत्र खाजगी क्षेत्रासाठी खूली करणे, विदेशी थेट गुंतवणूकीची मार्गदर्शक तत्वे शिथिल करणे, इत्यादी बदलामुळे राज्यातील उद्योगामध्ये जलद गतीने वाढ तसेच संरचनेत बदल झाले. चांगल्या पायाभूत सुविधा, कुशल मनुष्य बळाची उपलब्धता आणि चांगली सामाजिक स्थिती यामूळे सर्वात जास्त गुंतवणूकीचे प्रस्ताव आकर्षित करण्यामध्ये सातत्य राखले असून परिणामी इतर राज्याच्या तूलनेत जास्त रोजगार निर्मिती झाली आहे. राज्यामध्ये नवीन उद्योग उभारण्यासाठी ऑगस्ट १९९१ ते फेब्रुवारी २०१९ या कालावधीत भारत सरकारकडे राज्य शासनाने पाठविलेले रु. १२,८६,६९६ कोटी गुंतवणूकीसह २०३२३ औद्योगिक प्रस्ताव मंजूर करण्यात आले. त्यापैकी रु. ३०,६८,२५ कोटी (२३.८ टक्के) गुंतवणूकीचे ९०९८ प्रकल्प (४४.८ टक्के) कार्यान्वित झाले व त्यामधून १३.२३ लाख रोजगार निर्मिती झाली आहे.

**२) विदेशी थेट गुंतवणूक** : अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी जेव्हा देशांतर्गत भांडवलाचा तुटवडा असतो अशा परिस्थितीत गुंतवणूकीचे प्रमाण फारच अल्प असते. तेव्हा ती विदेशी भांडवलाच्या मदतीने भरुन काढता येते. विदेशी भांडवलाच्या अनेक प्रकारापैकी विदेशी थेट गुंतवणूक हा एक प्रमुख प्रकार आहे. परकियांनी एखाद्या देशात प्रत्यक्ष उत्पादनासाठी उद्योग संस्थेच्या उभारणीच्या स्वरुपात केलेली गुंतवणूक म्हणजे विदेशी थेट गुंतवणूक होय. ऑगस्ट १९९१ मध्ये स्वीकारण्यात आलेल्या खाजगीकरण व उदारीकरण धोरणामुळे आणि महाराष्ट्र शासनाने निर्माण केलेल्या पोषक वातावरणामुळे महाराष्ट्रात विदेशी थेट गुंतवणूक मोठया प्रमाणात होत आहे. देशाच्या पातळीवर इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात सर्वात जास्त विदेशी थेट गुंतवणूक करण्यात येत आहे.

विदेशी थेट गुंतवणूकीने औद्योगिक घटकामध्ये नाविण्यपूर्ण तंत्रज्ञान आणले असून घटकामधील स्पर्धात्मकता वाढविली आहे. तसेच राज्यातील स्थानिक बाजारपेठामधील देखील गुंतवणूक वाढविली आहे. राज्याचे व्यवसायासाठीचे अनूकूल वातावरण, विविध धोरणे आणि कुशल मनुष्यबळाची उपलब्धता, देशातील विदेशी थेट गुंतवणूकीमध्ये राज्यास आघाडीवर ठेवण्यास सहाय्यभूत ठरले आहे. औद्योगिक धोरण व संवर्धन विभाग भारत सरकारच्या अहवालानुसार एप्रिल २००० ते डिसेंबर २०१८ पर्यंत राज्यातील विदेशी थेट गुंतवणूक रु. ६,१०,३२३ कोटी असून ती देशातील एकूण विदेशी थेट गुंतवणूकीच्या ३१ टक्के आहे.

**३) विशेष आर्थिक क्षेत्र** : जागतिक दर्जाच्या मूलभूत सोयीसुविधा असणारा आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा करण्यास सक्षम आणि सरकारी बंधनमुक्त वातावरण असणारा वेगळा प्रभाग म्हणजे विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) होय. राज्याने विशेष आर्थिक क्षेत्र धोरण १० फेब्रुवारी २००६ पासून स्वीकारले असून राज्याच्या आर्थिक विकासाची वाढ जोमाने होण्यासाठी सेझची अंमलबजावणी करण्यात येत आहे. उद्योगांना चालना देणे आणि रोजगार निर्मिती या हेतूने विशेष आर्थिक क्षेत्र धोरण स्वीकारले आणि या क्षेत्रास करमुक्त, अडथळामुक्त व पोषक व्यापार धोरण असेल अशी काळजी घेतली आहे. राज्याने फेब्रुवारी २००६ पासून स्वीकारलेल्या विशेष आर्थिक क्षेत्र धोरणास अनुसरुन मार्च २०१९ पर्यंत राज्यात २४९ विशेष आर्थिक क्षेत्राचे प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यापैकी ४२३१ हेक्टर क्षेत्रावर रु. ३६,३५२ कोटी गुंतवणूकीची व सुमारे ५.९० लाख रोजगार निर्माण करणारी ३० विशेष आर्थिक क्षेत्रे कार्यान्वित झाली आहेत.

**४) माहिती तंत्रज्ञान संकूले** :– विदेशी गुंतवणूकीच्या दृष्टीने महाराष्ट्रास सर्वाधिक पसंतीचे स्थान बनवायचे असेल तर उत्कृष्ठ पायाभूत सेवा आणि माहिती–तंत्रज्ञान क्षेत्रास पोषक असे वातावरण निर्माण करणे अगत्याचे आहे हे लक्षात घेवून या धोरणानुसार माहिती–तंत्रज्ञान उद्योगासाठी जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे या क्षेत्रास जागतिक स्पर्धेस तोंड देवून काम करु शकतील असे सक्षम कामगार तयार यासाठी माहिती–तंत्रज्ञान संकूले ही संकल्पना पुढे आली. या संकूलाच्या संकल्पनेमु क्षेत्रासाठी अत्यावश्यक असलेल्या एकात्मिक पायाभूत सुविधांच्या विकासाला च मिळाली आहे. या दृष्टीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, शहर व औ विकास महामंडळ व सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क ऑफ इंडिया यांनी विकसित व ३७ सार्वजनिक माहिती तंत्रज्ञान संकूले सुमारे रु. १८,००० कोटी गुंतवणूक व सुम ६८ लाख रोजगारासह कार्यान्वित आहेत.

माहिती तंत्रज्ञान उद्योगासाठी जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा करण्यासाकरीता खाजगी क्षेत्रास सहभागी करुन घेण्यात आले आहे. या अंतर्गत खाजगी माहिती तंत्रज्ञान संकूले मंजूर करण्यात आली असून त्यापैकी रु.१९,९२७ गुंतवणूकीची व सुमारे ५.३ लाख रोजगार निर्माण करणारी १९३ माहिती तंत्रज्ञान कार्यान्वित आहेत. उर्वरीत ३३४ माहिती तंत्रज्ञान संकूलामध्ये रु. ६२,२१७ कोटी प्रस्त गुंतवणूकीसह सुमारे १०.८१ लाख रोजगार संधी निर्माण होणे अपेक्षित आहे. ख माहिती तंत्रज्ञान संकूले पूणे (१८१), मुंबई शहर व मुंबई उपनगर (१७२), ठाणे (१ नागपूर (५), नाशिक (५), औरंगाबाद (३) आणि वर्धा (१) या जिल्हयांमध्ये अ माहिती तंत्रज्ञानाधिष्ठीत उद्योगाच्या बाबतीत महाराष्ट्र हे आघाडीवरचे राज्य आहे. राज्याच्या तुलनेत माहिती तंत्रज्ञान कंपन्यांना आपल्याकडे आकर्षित करण्यात मह मोठया प्रमाणावर यशस्वी ठरले आहे.

**५) जैवतंत्रज्ञान संकूले** :– कृषि, पशुसंवर्धन, आरोग्य, पर्यावरण, संरक्षण इत्यादी क्षेत्रा जैवतंत्रज्ञानाचा मोठया प्रमाणावर वापर होत आहे. जैव तंत्रज्ञानाची क्षमता लक्षात महाराष्ट्र शासनाने २००१ मध्ये जैवतंत्रज्ञान धोरण जाहीर केले आहे. राज्यात जैवतं घटक स्थापित करणाऱ्या कंपन्यांना विविध आर्थिक प्रोत्साहन व कर सवलतीचा समा या धोरणात दिल्या आहेत. राज्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ परिसरात जा आणि हिंजवडी (पूणे), येथे सार्वजनिक क्षेत्रातील दोन जैव–तंत्रज्ञान संकूले विकि करण्यात आली आहेत. सुमारे रु. ३०५ कोटी अपेक्षित गुंतवणूकीची सहा खाज तत्वावरील जैव तंत्रज्ञान संकूले राज्यात प्रस्तावित आहेत. राज्यात सुमारे रु. ४७३३ क गुंतवणूक प्रस्तावित असून १.६५ लाख रोजगार निर्मिती होणे अपेक्षित असलेली जैवतंत्रज्ञान विशेष आर्थिक क्षेत्रे प्रस्तावित करण्यात आली आहेत.

आक्टोबर २०१८ पर्यंत सुक्ष्म, लघू व मध्यम उद्योगांतर्गत रु. २६१ कोटी गुंतवणूकीचे घटक नोंदणीकृत असून त्याद्वारे ०.८७ लाख रोजगार निर्मिती होणे अपेक्षित आहे. मोठया उद्योगांतर्गत रु. ११२० कोटी गुंतवणूकीचे १६ नोंदणीकृत घटकाद्वारे ०.७१ लाख रोजगार निर्मिती होणे अपेक्षित आहे.

**६) सहकारी औद्योगिक वसाहती** :– शहरी भागामध्ये केंद्रीकृत उद्योग ग्रामीण भागाम विकेंद्रीत करण्याच्या हेतूने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्राबाहेर सहका तत्तावर औद्योगिक वसाहती स्थापन करण्याचा कार्यक्रम राज्याने हाती घेतला आहे. दि ३१ डिसेंबर २०१८ अखेर एकुण १४२ सहकारी औद्योगिक वसाहती नोंदणीकृत असू त्यापैकी १०७ कार्यरत वसाहतीमधील ८०३७ कार्यान्वित घटकामध्ये सुमारे १.७९ लाख रोजगार निर्मिती झाली आहे. एकूण रोजगारामध्ये ४८.७ टक्के रोजगार पूणे विभागात, २७ ९ टक्के रोजगार नाशिक विभागात, १६.३ टक्के रोजगार कोकण विभागात (मुंबई समाविष्ट) व ७.१ टक्के रोजगार उर्वरीत विभागात आहे.

**७) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ** :– राज्य शासनाचे प्रमुख औद्योगिक पायाभू विकास संस्था म्हणून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची १९६२ मध्ये स्थापना झाली. नियोजित व सुयोग्यरित्या औद्योगिक विकास होण्यासाठी औद्योगिक क्षेत्र निर्मा

करणे व औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून कार्य करणे हे मुख्य उध्दिष्ठ आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ हे देशातील सर्व औद्योगिक विकास महामंडळामध्ये सर्वाधिक औद्योगिक जमिनीची मालकी असलेल्यापैकी एक आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने २५१ औद्योगिक क्षेत्रे निर्माण केले असून त्यापैकी १०६ मोठे औद्योगिक क्षेत्रे, ९१ लघू औद्योगिक क्षेत्रे, व ५४ विकास केंद्रे आहेत. त्याचबरोबर विशेष आर्थिक क्षेत्र, सिल्वर झोन आणि माहिती तंत्रज्ञान, जैव तंत्रज्ञान, वाईन (द्राक्ष प्रक्रिया), रत्ने अशा विविध औद्योगिक क्षेत्रासाठी विशेष संकूले विकसित केली आहेत. ३१ डिसेंबर २०१८ पर्यंत रु. १,८०,१७० कोटी गुंतवणूक व १३.७६ लाख रोजगार क्षमता असलेले ४९,५०५ उद्योग घटक आहेत. एकूण ८९,९६३ विकसित भूखंडापैकी सुमारे ७६ टक्के भूखंड उद्योजकांना वितरित करण्यात आले आहेत.

**८) दिल्ली—मुंबई औद्योगिक मार्गिका :—** दिल्ली—मुंबई औद्योगिक मार्गिका देशातील सर्वात महत्वकांक्षी पायाभूत सुविधा कार्यक्रम असून हा देशाची राजधानी असलेली दिल्ली व आर्थिक केंद्र असलेली मुंबई यांच्या दरम्यान नियोजित औद्योगिक विकास प्रकल्प आहे. पायाभूत सुविधा क्षेत्रातील अद्ययावत तंत्रज्ञान एकवटून नवीन औद्योगिक शहरे 'स्मॉर्ट शहरे' म्हणून विकसित करणे हा या कार्यक्रमाच्या उद्देश आहे. या मार्गिकेत राज्यातील शेंद्रा—बिडकीन आणि दिघी बंदर या दोन औद्योगिक क्षेत्राचा समावेश आहे. या मार्गिकेचे यथार्थदर्शी नियोजन पूर्ण झाले असून टप्पा—१ मधील भाग म्हणून निश्चित झालेल्या शहरासाठी मुख्य आराखडा व प्राथमिक अभियांत्रिकी कामे हाती घेण्यात आली आहेत. या मार्गिकेचा एक भाग म्हणून कामावर चालत जाणे (वॉक—टु—वर्क) या संकल्पनेवर आधारित सुनियोजित आणि हरित स्मार्ट औद्योगिक शहर अशा राज्यातील १०,००० एकर क्षेत्रात वसलेल्या औरंगाबाद औद्योगिक शहरांचा (ऑरीक) विकास केला जात आहे. यामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा तसेच स्वच्छ, पूनर्वापरासाठी व योग्य नसलेल्या वस्तूपासून नवीन वस्तू निर्माण करण्याच्या पध्दतीचा अवलंब करण्यात येत आहे. ऑरीकची सुमारे ३५ भूखंड गुंतवणूकदाराना वाटप करण्यात आली आहेत.

**समारोप :**

अर्थव्यवस्थेत उद्योगक्षेत्राचे प्रमाण जसजसे वाढत जाते तसतसे आर्थिक विकासाचा वेगसुध्दा वाढत जातो. अर्थव्यवस्था सुदृढ, संतूलित आणि जलद आर्थिक विकासा करीता उद्योगक्षेत्राचा विकास ही आधुनिक काळातील संजीवनी मंत्र बनलेला आहे आणि महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्राच्या निर्मितीपासूनच त्या दिशेने प्रयत्न केल्यामुळे महाराष्ट्र हे औद्योगिक क्षेत्रामध्ये अग्रगण्य राज्यापैकी एक असून आर्थिक विकासात नेहमीच आघाडीवर राहिलेले आहे. महाराष्ट्राची भौगोलिक स्थिती, वित्तिय सोयी, मूलभूत सुविधा उपलब्ध असल्यामुळे राज्य हे नेहमीच देशी व परदेशी गुंतवणूकदारांचे पसंतीचे राज्य राहिलेले आहे. राज्याचा औद्योगिक पाया वस्त्रोद्योग वाहननिर्मिती, अभियांत्रिकी, पोलाद निर्मिती, रसायने विद्युत, रस्ते व आभूषण, अन्नप्रक्रिया, औषधे आणि माहिती—तंत्रज्ञान व त्यावर आधारित सेवा अशा भिन्न क्षेत्राचा आहे. राज्याने आपले व्यावसायीक वातावरण सुधारण्याच्या उद्देशाने नियमितपणे धोरणे जाहीर केले आहेत. जागतिकीकरण, खाजगीकरण, आणि उदारीकरण यामुळे निर्माण झालेल्या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी राज्याने १९९३ मध्ये पहिले औद्योगिक धोरण स्विकारले आणि त्यानंतर १९९५, २००१, २००६ आणि २०१३ मध्ये धोरणात सुधारणा केल्या पूर्णतः सार्वजनिक क्षेत्राच्या प्रभावाखाली असलेले क्षेत्र खाजगी क्षेत्रासाठी खूली करणे, विदेशी थेट गुंतवणूक वाढीसाठी मानके शिथिल करणे, माहिती तंत्रज्ञान, जैव तंत्रज्ञान, विशेष आर्थिक क्षेत्रे, विशाल प्रकल्प, उद्योग उभारणी व नवीन गुंतवणूकीसाठी ई—माध्यम निर्माण करणे, कृषि क्षेत्रावरील उद्योगाच्या विकासासाठी वाढीव चटई क्षेत्र मंजूर करणे तसेच औद्योगिक वाढीस चालना देण्यासाठी शासनाने उद्योगासाठी



विविध परवान्याची संख्या, कमी करणे, मैत्रीच्या (महाराष्ट्र उद्योग, व्यापार, व गुंतवणूक सहाय्य कक्ष) माध्यमातून परवानग्या एकाच ठिकाणी देणे इत्यादी सर्वसमावेशक उपाययोजना करण्याच्या प्रक्रियेस सुरुवात केली आहे. पायाभूत सुविधा व औद्योगिकरणासाठी अद्ययावत शहरे यांचा विस्तार, औद्योगिक समूहासाठी संपर्क सुविधा, औद्योगिक संकूले, लेजिस्टीक संकूले इत्यादीचा विकास करण्यावर शासनाने लक्ष केंद्रीत केले आहे. मुंबई, पूणे, ठाणे याशिवाय नाशिक, औरंगाबाद, नागपूर आणि कोल्हापूर यासारख्या दुय्यम स्तरावरील शहरांचा औद्योगिक केंद्र म्हणुन झालेल्या उदयामुळे राज्याच्या औद्योगिक विकासामध्ये उल्लेखनीय वाढ झाली आहे. भारतामधील वस्तूनिर्माण क्षेत्राच्या क्षमतांची आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख होण्यासाठी 'मेक इन इंडिया' कार्यक्रमाचे मुंबई येथे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमामुळे राज्यामध्ये गुंतवणूक करण्यासाठी प्रोत्साहन मिळून गुंतवणूकदाराचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे. या सर्व उपायांचा परिपाक म्हणजे भारतातील, औद्योगिक क्षेत्रामध्ये राज्याने आपले आघाडीचे स्थान कायम राखले आहे.

**References:**


Baratwal R.R. (1994), Industrial Economics, An introduction Text Book, wiley Eastern Limited, New Delhi.

Burange L.G.(2003), Industry : Changing structure, composition and slacking Growth Economy of Maharashtra (ed), Bhalchandra Mungekar, Dr. Ambedkar Institute of social and Economic change

Economic survey of Maharashtra (2018-19), Directorate of Economic and statistical, Planning, Department, Govt. of Maharashtra Mumbai.

रमेश सिंह (२०१६), भारतीय अर्थव्यवस्था, मेसग्रेव हिल एज्युकेशन प्रा.लि.

देसाई/भालेराव (२०१७), भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, पुणे.

रायखेलकर/दामजी (२०११), औद्योगिक अर्थशास्त्र, विद्याबुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

माधव बिरादार (२०१८), महाराष्ट्राची अर्थव्यवस्था विद्याबुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.


[The final revised version of this paper was received on 10 January 2020]